MHSO110015592014

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६२४/२०१४</u>**

आप्पासाो घाडगे विरुध्द धन्यकुमार गांधी

**<u>निशाणी क्र. ४८ वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. १९ यांचे वारस पटलावर घेणे कामी झालेला अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम रदद् बातल होवुन मिळणेसाठी सदरहु अर्ज केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र १९ ताराबाई जयसिंग जाधव या दिनांक ३०.११.२०१९ रोजी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र १९ ताराबाई जयसिंग जाधव यांना मुलगा रमेश, पती जयसिंग असे कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादी क्र १९ यांचे मृत्यु प्रमाणपत्र वेळेत उपलब्ध न झाल्याने वादीस प्रतिवादी क्र १९ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेता आले नाहीत. त्यामुळे दावा प्रतिवादी क्र १९ विरुध्द अबेट झाला आहे. प्रस्तुत दावा हा स्थावर मिळकतीबाबत जाहीर ठराव व वाटपासाठीचा असल्याने मयत वारस रेकॉर्डवर न आणल्यास वादीचे कधीही न करुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब पारीत करण्यात आलेला अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम रदद् बातल करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र १, ३, ५, ६ व ७ यांनी निशाणी क्र ५६ कडे म्हणणे सादर करुन सक्त हरकत नोंदविली आहे. प्रतिवादी क्र १, ३, ५, ६ व ७ यांचे असे कथन केले आहे की, दाव्यातील मिळकती एकत्र कुटुंबाच्या आहेत हे अद्याप शाबीत झालेले नाही. मयत प्रतिवादी क्र १९ ताराबाई ही वादीने नमूद केलेल्या दावा परिच्छेद २ मधील वंशावळी प्रमाणे सख्खी बहीण आहे आणि अर्जात नमूद केले प्रमाणे ती दिनांक ३०.११.२०१९ रोजी मयत झालेली आहे. वादीने ६ वर्षाच्या विलंबाने अर्ज दाखल केला आहे. अर्जात विलंबाचे कारण नमूद नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र २, ४ व ८ ते १९ यांनी अर्जास म्हणणे सादर न केल्याने अर्ज त्यांच्या म्हणण्याविना पुढे चालविण्यात आला.

५. दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा सदर जाहीर ठराव व वाटपासाठी केला आहे. अशा दाव्याकरिता सर्व पक्षकारांचा समावेश दाव्याकामी असणे दाव्याच्या अंतिम निकालाकरिता आवश्यक आहे. सबब प्रतिवादी क्र १९ विरुध्द पारीत करण्यात आलेला अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम रदद् बातल करणे न्यायोचित होईल. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परिणामी खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज निशाणी क्र. ४८ मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १९ ताराबाई जयसिंग जाधव यांच्या वारसांची नावे अभिलेखी घेण्यास झालेला अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम हा वादीने रक्कम रूपये २०००/-(अक्षरी रूपये दोन हजार मात्र) पुढील तारखेपर्यंत प्रतिवादींना देण्याच्या अटीवर प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2026.08.13 17:47:34 +0530

(आर. डी. शिंदे)
दिनांक १३.०८.२०२६ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर,
माळशिरस

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | $4^{th}$ Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 13 / 08 / 2026. |
| **Order uploaded on** | **:** | 13 / 08 / 2026. |